दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

1,22,570
डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे
पुण्यातील लोकप्रिय दैनिक



• वर्ष : ०३ • अंक : ३०८ • पुणे • गुरुवार, दि. ३० जुलै २०२६ • मराठी दैनिक • पाने ४ • किंमत : २ रूपये • RNI No.-MAHMAR/2023/89313

# खासगी आस्थापनांवरच कारवाई का?

## तुकाराम मुंढेंच्या FDA च्या कारवाईवर हायकोर्टाचे ताशेरे, मंत्र्यांच्या आस्थापनांचीही तपासणी करण्याचे निर्देश

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

राज्यात गेल्या काही महिन्यांपासून अन्न व औषध प्रशासनाने (एफडीए) अन्न सुरक्षा नियमांच्या अंमलबजावणीसाठी मोठ्या प्रमाणावर धडक कारवाई सुरू केली आहे. पानटपऱ्यांपासून ते पंचतारांकित हॉटेलांपर्यंत अनेक आस्थापनांवर कारवाई करण्यात आली. मात्र, या कारवाईच्या पद्धतीवरच आता मुंबई उच्च न्यायालयाने गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. खासगी आस्थापनांवरच कठोर कारवाई करण्याऐवजी सरकारी आणि मंत्र्यांच्या मालकीच्या आस्थापनांचीही तपासणी करा, असे स्पष्ट निर्देश न्यायालयाने एफडीएला दिले आहेत. नवी मुंबईतील एका पंचतारांकित हॉटेलचा



अन्न सुरक्षा परवाना रद्द करण्यात आल्याच्या निर्णयाला आव्हान देत संबंधित व्यवस्थापनाने मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली आहे. या याचिकेवर प्रभारी मुख्य न्यायमूर्ती रवींद्र घुगे आणि न्यायमूर्ती गौतम अंखड यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. सुनावणीदरम्यान एफडीएच्या कारवाईबाबत न्यायालयाने तीव्र नाराजी व्यक्त केली.

एफडीएने पंचतारांकित हॉटेलच्या स्वयंपाकगृहात झुरळ आढळल्याच्या कारणावरून थेट अन्न परवाना रद्द केल्याबाबत न्यायालयाने प्रश्न उपस्थित केला. "परवा माझ्या डेस्कवर एक मोठे झुरळ दिसले, म्हणून मी न्यायालयाचे कामकाज बंद करायचे का?" असा उपरोधिक सवाल करत, एखाद-दुसरे झुरळ आढळल्याच्या आधारे थेट परवाना रद्द करणे योग्य ठरत नाही, असे न्यायालयाने स्पष्ट केले. कारवाई करताना दोषाचे गांभीर्य, परिस्थिती आणि त्यावरील सुधारणा यांचाही विचार होणे आवश्यक असल्याचे निरीक्षण खंडपीठाने नोंदवले.

एफडीएची कारवाई केवळ खासगी क्षेत्रापुरती मर्यादित राहिल्याबद्दलही न्यायालयाने नाराजी व्यक्त केली. आजपर्यंत किती सरकारी कार्यालये, निमसरकारी संस्था किंवा मंत्र्यांच्या मालकीच्या आस्थापनांची तपासणी करण्यात आली? असा सवाल न्यायालयाने उपस्थित केला. मंत्रालय, उच्च न्यायालय परिसर, सरकारी कँटीन, निमसरकारी संस्था तसेच मंत्र्यांच्या मालकीच्या आस्थापनांची तातडीने तपासणी करून त्याचा सविस्तर अहवाल न्यायालयात सादर करण्याचे निर्देश एफडीएला देण्यात आले आहेत.

## स्पाच्या नावाखाली वेश्याव्यवसाय

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

हडपसर परिसरातील तुपे कॉम्प्लेक्समध्ये स्पाच्या नावाखाली चालवल्या जाणाऱ्या वेश्याव्यवसायावर काळेपडळ पोलिसांनी छापा टाकला. या कारवाईत एका पीडित महिलेची सुटका करण्यात आली. या प्रकरणी स्पा सेंटर चालकासह तिघांवर हडपसर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत सहाय्यक फौजदार राजस शेख यांनी फिर्याद दिली आहे. त्यानुसार, एका स्पा सेंटरमध्ये पैशांचे आमिष दाखवून महिलेकडून वेश्याव्यवसाय करून घेतला जात होता. याबाबत माहिती मिळाल्यानंतर परिमंडळ सहाचे पोलिस उपायुक्त जीवन बेनिवाल यांनी कारवाईच्या सूचना दिल्या. त्यानुसार काळेपडळ पोलिस ठाण्याच्या वरिष्ठ निरीक्षक गिरीषा निंबाळकर यांच्या पथकाने ही कारवाई केली.

## पारगावमध्ये अल्पवयीन सख्ख्या बहिणींचा विनयभंग

### दोन युवकांवर पोक्सो अंतर्गत गुन्हा, अटक

**पारगाव (दै. आरंभ पर्व)**

पारगाव (ता. दौंड) येथील न्यू इंग्लिश स्कूलमध्ये शिकणाऱ्या अल्पवयीन सख्ख्या बहीणींचा विनयभंग केल्याप्रकरणी खुटबाव येथील दोन युवकांवर पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल झाला आहे. यामध्ये आरोपी प्रविण गणपत थोरात व दिनेश दत्तात्रय पासलकर (दोन्ही रा. खुटबाव ता. दौंड. जि. पुणे) यांना अटक करण्यात आली आहे. या युवकांनी २० जुलै रोजी सायंकाळी ५.०० वाजता व २७ जुलै रोजी सायंकाळी ५.०० वाजता या युवतींचा विनयभंग केला आहे.



वरील नमूद केलेल्या वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी व फिर्यादी यांची बहिण या शाळेतून घरी येत असताना आरोपींनी त्यांच्या ताब्यातील (इको गाडी नंबर एम. एच. ४२ बी एस ८५३५) यामध्ये येवून फिर्यादी व फिर्यादीची बहिण यांचा पाठलाग केला. त्यांना गाडी आडवी लावून आरोपी क्र. १ याने गाडीतून खाली उतरून मला 'तू मला खूप आवडतेस' असे म्हणून फिर्यादीचा डावा हात हात धरून त्याचे जवळ ओढून घेऊन फिर्यादीचे मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य केले.



## थोडक्यात पण महत्त्वाचे



### कचरा डेपो दुर्घटनेतील गंभीर जखमींवर मेडिकव्हर हॉस्पिटलमध्ये नवजीवन

पुणे (आरंभ पर्व) : मोशी येथील कचरा डेपो संरचना कोसळल्याच्या दुर्घटनेत गंभीर जखमी झालेल्या दोन रुग्णांवर भोसरी येथील मेडिकव्हर हॉस्पिटलमध्ये अत्याधुनिक बहुविद्याशाखीय ट्रॉमा केअरच्या माध्यमातून यशस्वी उपचार करण्यात आले असून दोन्ही रुग्णांना सुखरूप डिस्चार्ज देण्यात आला आहे. या दुर्घटनेतील गंभीर जखमी महेश चंद्रकांत राऊत (वय ३६) यांना बचाव पथकाने बाहेर काढल्यानंतर ९ जुलै २०२६ रोजी पहाटे मेडिकव्हर हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. त्यांच्या डाव्या मांडीला मोठी उघडी जखम, कपाळ व डोक्याला गंभीर जखमा व कवटीचे फ्रॅक्चर, डाव्या हाताच्या टेंडनला इजा तसेच कमरेच्या मणक्याला (लंबर स्पाईन) फ्रॅक्चर अशा अनेक जीवघेण्या दुखापती झाल्या होत्या. रुग्णाची प्रकृती अत्यंत गंभीर असल्याचे लक्षात घेऊन ऑर्थोपेडिक्स, प्लास्टिक अँड रिकन्स्ट्रक्टिव्ह सर्जरी, न्यूरोसर्जरी, क्रिटिकल केअर, इंटरनल मेडिसिन, नेफ्रोलॉजी आणि सर्जिकल गॅस्ट्रोएन्टेरोलॉजी विभागातील तज्ज्ञ डॉक्टरांच्या बहुविद्याशाखीय पथकाने तातडीने उपचार सुरू केले. डॉ. राहुल दुला गागरे आणि डॉ. दीपक सदाशिव पाटील यांच्या नेतृत्वाखाली रुग्णावर टप्प्याटप्प्याने अनेक शस्त्रक्रिया करण्यात आल्या. यामध्ये आपत्कालीन वाउंड डिब्राइडमेंट, व्हॅक्यूम-असिस्टेड क्लोजर (VAC) थेरपी, बायोडिग्रेडेबल टेम्पोरायझिंग मॅट्रिक्स (BTM) चा वापर करून सॉफ्ट टिश्यू पुनर्बांधणी, डाव्या हाताच्या टेंडनची दुरुस्ती, शरीरात घुसलेले काचेचे तुकडे काढणे, चेहऱ्यावरील जखमांवर उपचार तसेच डोके आणि मानेवरील अनेक जखमा बंद करण्यासाठी शस्त्रक्रिया करण्यात आल्या.

### इमारतींच्या सुरक्षिततेसाठी अग्निरोधक मिनरल पेंट तंत्रज्ञान सादर





पुणे (आरंभ पर्व) : भारतातील निवासी आणि व्यावसायिक इमारतींमध्ये लागणाऱ्या आगीच्या वाढत्या घटनांच्या पार्श्वभूमीवर, 'झायडेक्स पेंट्स'ने भिंतींच्या पारंपारिक रंग या दुर्लक्षित धोक्याकडे लक्ष वेधले आहे. एनसीआरबीच्या (NCRB) आकडेवारीनुसार, बंदिस्त इमारतींमधील आगीत मृत्यूचे मुख्य कारण ज्वाला नसून विषारी धूर हे असते. हल्ली वापरले जाणारे पेट्रो-पॉलिमर आधारित अॅक्रेलिक आणि प्लास्टिक-इमल्शन रंग उच्च तापमानात कार्बन मोनॉक्साइड आणि हायड्रोजन सायनाइडसारखे अत्यंत घातक वायू तयार करतात, ज्यामुळे लोकांना सुरक्षित बाहेर पडण्यासाठी वेळ मिळत नाही. या धोक्यावर मात करण्यासाठी झायडेक्सने 'सिलिकेट मिनरल पेंट्स' सादर केले आहेत. पोटॅशियम सिलिकेट आणि खनिजांपासून बनवलेले हे 'क्लास १' दर्जाचे अग्निरोधक रंग अकार्बन्सरूप असल्याने पेट घेत नाहीत आणि विषारी धूरही सोडत नाहीत.



### सकल जैन वधू-वर परिचय संस्थेच्या संकेतस्थळाचे उद्घाटन

पुणे (आरंभ पर्व) : सकल जैन वधू-वर परिचय संस्थेच्या संकेतस्थळाचे उद्घाटन ४१ वर्षांच्या कार्याला डिजिटल बळ महर्षिनगर पुढारी वृत्तसेवा : जैन समाजातील विवाह जुळवणीचे ४१ वर्षांपासून कार्य करणाऱ्या जैन वधू-वर परिचय संस्थेच्या नवीन संकेतस्थळाचे उद्घाटन व सर्व जैन पंथीय ऑनलाईन मेळावा उदघाटन महेंद्र शहा यांच्या हस्ते झाले. श्वेतांबर, दिगंबर, स्थानकवासी व तेरापंथ या चारही संप्रदायांचे ज्येष्ठ येथे उपस्थित होते. संस्थेचे मार्गदर्शक महेंद्रभाई शहा, अध्यक्ष मुकेश शहा, रोहित जवेरी, भावेश शहा, योगेश शहा, पृथ्वीराजबधोका, अनिल वखारिया अचल जैन, विलासकुमार बाफना,संपत गादिया, नवीनशहा, दिलीप मेहता उपस्थित होते. संकेतस्थळामुळे देश-विदेशातील जैन कुटुंबांना घरबसल्या मुला-मुलींची जीवनवृत्ते पाहणे व नोंदणी करणे शक्य होणार आहे. ५०० पेक्षा वधु-वरांनी संकेतस्थळवर नोंदणी केली.

### यतीराज बहुउद्देशीय सामाजिक प्रतिष्ठानचे नागरिकांना आवाहन




पुणे(आरंभपर्व):आजच्या धकाधकीच्या आणि व्यस्त जीवनशैलीत अनेकांना अध्यात्म आणि धर्मग्रंथांचा अभ्यास करण्यासाठी वेळ मिळत नाही. हीच अडचण लक्षात घेऊन, जिज्ञासू साधकांसाठी घरबसल्या अगदी सोप्या भाषेत 'श्रीमद्भगवद्गीता' शिकण्याची सुवर्णसंधी उपलब्ध करून देण्यात आली आहे. संस्कृत, योग आणि वेदान्त विषयाचे ज्येष्ठ अभ्यासक प्रा. हरेश कमलकान्त आशर (मधुरीबेन) यांच्या वतीने या विशेष ऑनलाईन वर्गांचे आयोजन करण्यात आले आहे. कुटुंबात शांतता, सद्भावना टिकवून ठेवण्यासाठी आणि लहान मुलांवर उत्तम संस्कार व्हावेत या उद्देशाने हे वर्ग सुरू करण्यात येत आहेत. या वर्गांचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे हे वर्ग आठवड्यातून फक्त एकच दिवस असणार आहेत. त्यामुळे नोकरी, व्यवसाय किंवा शिक्षण सांभाळून कोणालाही आपल्या वेळेनुसार घरबसल्या यात सहभागी होता येईल. हे वर्ग पूर्णपणे ऑनलाईन आणि मोफत (Free) असणार असून, भगवद्गीतेचे हे अनमोल ज्ञान अत्यंत सोप्या हिंदी भाषेत दिले जाईल. "आजच्या धावपळीच्या युगात मानसिक शांतता लाभण्यासाठी गीतेचे ज्ञान अत्यंत आवश्यक आहे. दैनंदिन चिंता आणि तणावातून मुक्त होऊन आनंदी जीवन जगण्यासाठी अबालवृद्धांनी या सुवर्णसंधीचे सोने करावे आणि आपले जीवन तणावमुक्त करावे," असे आवाहन 'यतीराज बहुउद्देशीय सामाजिक प्रतिष्ठान, महाराष्ट्र राज्य'च्या सचिव मनीषा लहारे यांनी केले आहे. प्रा. हरेश आशर यांनीही आवाहन केले आहे की, ज्या साधकांना मनापासून गीता शिकण्याची इच्छा आहे, त्यांनी या सुवर्णसंधीचा अवश्य लाभ घ्यावा. **अशी करा नोंदणी :** या मोफत वर्गांसाठी जागा मर्यादित असून, इच्छुकांनी आजच संपर्क साधून आपले नाव नोंदवणे आवश्यक आहे. अधिक माहितीसाठी किंवा नाव नोंदणीसाठी साधक 9819004477 (व्हॉट्सअॅप) किंवा 8169955958 (कॉल) या क्रमांकांवर संपर्क साधू शकतात.

# पर्यावरणाचे संरक्षण ही प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी

## प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया यांचे प्रतिपादन; 'सूर्यदत्त'तर्फे 'सूर्य ग्रीन अर्थ अवॉर्ड २०२६'चे वितरण

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

"पर्यावरण संवर्धन ही केवळ सरकार किंवा संस्थांची जबाबदारी नसून, प्रत्येक नागरिकाने आपल्या दैनंदिन जीवनातून त्यात योगदान देणे आवश्यक आहे. पर्यावरणीय समस्यांवर प्रभावी उपाय शोधण्यासाठी वैयक्तिक पातळीपासून सुरुवात होणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन भारतीय विज्ञान शिक्षण व संशोधन संस्थेचे (आयसर) सल्लागार डॉ. अरविंद नातू यांनी केले. शाश्वत जीवनशैलीचा स्वीकार समाजापर्यंत पोहोचविण्यासाठी त्यांनी विकसित केलेल्या 'आर-९ पॉइंट प्रोग्राम'ची माहितीही त्यांनी दिली.

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त सूर्यदत्त एज्युकेशन फाउंडेशन संचालित सूर्यदत्त कॉलेज ऑफ फार्मसी, हेल्थकेअर अँड रिसर्चच्या वतीने आयोजित 'सूर्य ग्रीन अर्थ अवॉर्ड्स २०२६' वितरण सोहळ्यात डॉ. अरविंद नातू बोलत होते.

'सूर्यदत्त'च्या बावधन कॅम्पसमधील बन्सी-रत्न सभागृहात आयोजित कार्यक्रमात कायनेटिक कम्युनिकेशन्स लिमिटेडचे संचालक डॉ. दीपक शिकारपूर, 'सूर्यदत्त'च्या उपाध्यक्षा सुषमा चोरडिया, सहयोगी उपाध्यक्षा स्नेहल नवलखा, मुख्य विकास अधिकारी सिद्धांत चोरडिया, डॉ. सारिका झांबड आदी उपस्थित होते.

यावेळी पर्यावरण आणि शाश्वत विकास क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या



मान्यवरांना 'सूर्य ग्रीन अर्थ अवॉर्ड २०२६'ने सन्मानित करण्यात आले. मेधा ताडपत्रीकर, डॉ. राहुल मराठे, डॉ. श्वेता लोखंडे, शिल्पा भालेराव, प्राची शेवगावकर, डॉ. किरण वैद्य यांना पुरस्कार देण्यात आला. मानपत्र, सुवर्णपदक व 'सूर्यदत्त'चे उपरणे देऊन सन्मानित करण्यात आले.

प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया म्हणाले, "पर्यावरणाचे संरक्षण ही प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी आहे. आपण पर्यावरणाचे मालक नाही, तर त्याचे केवळ विश्वस्त आहोत. त्यामुळे पर्यावरणाचे जतन, संवर्धन आणि समृद्धीकरण करण्यासाठी प्रत्येकाने आपले योगदान दिले पाहिजे, जेणेकरून ही अमूल्य नैसर्गिक संपदा आपण पुढील पिढ्यांकडे सुरक्षितपणे सुपूर्द करू शकू."

डॉ. दीपक शिकारपूर यांनी हरित माहिती तंत्रज्ञान (ग्रीन आयटी) आणि इंटरनेट ऑफ थिंग्ज (आयओटी) यांसारख्या तंत्रज्ञानाचा वापर करून पर्यावरण संवर्धनास चालना देण्याची गरज व्यक्त केली. तसेच पाणीटंचाईसारख्या गंभीर समस्यांवर मात करण्यासाठी तंत्रज्ञानाची भूमिका महत्त्वाची असल्याचे त्यांनी सांगितले.

मेधा ताडपत्रीकर यांनी पर्यावरणपूरक नवकल्पनांची आवश्यकता अधोरेखित केली. डॉ. राहुल मराठे यांनी शाश्वत शेती आणि पर्यावरणपूरक वातावरण निर्मितीचे महत्त्व सांगितले. डॉ. श्वेता लोखंडे यांनी जलसंपदा आणि आरोग्य क्षेत्रातील परस्परसंबंध स्पष्ट करत विद्यार्थ्यांना पर्यावरण रक्षणासाठी पुढाकार घेण्याचे आवाहन केले. शिल्पा भालेराव यांनी उद्योग क्षेत्रात शाश्वत पद्धतींचा अवलंब करण्यावर भर दिला, तर प्राची शेवगावकर यांनी हवामान बदलाचा सामना करण्यासाठी प्रत्येकाने आपल्या परिसरात कृतीशील भूमिका घ्यावी, असे सांगितले. डॉ. किरण वैद्य यांनी हरितगृह परिणामाचे पर्यावरणावर होणारे दुष्परिणाम स्पष्ट केले.

सुषमा चोरडिया यांनी सूर्यदत्त संस्थेच्या स्थापनेपासूनच पर्यावरणपूरक कॅम्पसवर भर दिला आहे. वृक्षाथॉनसारख्या उपक्रमांतून विद्यार्थ्यांमध्ये 'झाडे लावा, झाडे जगवा' हा संदेश दिला जातो. विद्यार्थ्यांना पर्यावरण संवर्धन उपक्रमात सामावून घेतले जाते, त्यातून त्यांच्यामध्ये पर्यावरणाविषयी आस्था निर्माण होते, असे सांगितले.

# नियोजनपूर्वक ज्ञान आत्मसात करणे आवश्यक

## प्रा. डॉ. पराग काळकर

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

सध्याच्या काळात केवळ परीक्षेमध्ये मिळालेले गुण पुरेसे ठरत नाहीत तर प्रत्येकाने नियोजनपूर्वक ज्ञान आणि कौशल्य आत्मसात करणे आवश्यक आहे. ज्ञान आणि कौशल्य आत्मसात केल्यास जगात काहीही साध्य करता येते, याची जाणीव सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्र -कुलगुरू प्रा. डॉ. पराग काळकर यांनी विद्यार्थ्यांना करून दिली. विश्वभूषण डॉ बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक महोत्सव समिती आणि रिपब्लिकन पक्ष आठवले गटाच्या वतीने दहावी आणि बारावीच्या परीक्षेत उल्लेखनीय यश प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी डॉ. काळकर यांच्यासह आमदार सिद्धार्थ शिरोळे, आयोजक व पुण्याचे उपमहापौर परशुराम वाडेकर, रिपब्लिकन पक्ष शहराध्यक्ष संजय सोनवणे, नगरसेवक सनी निम्हण, नगरसेविका सपना छाजेड, नगरसेविका भक्ति गायकवाड, रिपब्लिकन पक्ष शिवाजीनगर



विधानसभा मतदारसंघ अध्यक्ष अविनाश कदम, दिशा कॉम्प्युटर इन्स्टिट्यूटचे संचालक किरण लोखंडे, माजी उपमहापौर सुनीता वाडेकर इत्यादी मान्यवर उपस्थित होते. पुढे बोलताना डॉ. काळकर म्हणाले, पुण्यात जन्माला येणे किंवा शिक्षणाची संधी मिळणे हे विद्यार्थ्यांसाठी भाग्याचे आहे. पुणे शहराला शिक्षणाची शेकडो वर्षांची परंपरा आहे. पुण्यात 35 हून अधिक विद्यापीठे असून शिक्षणाच्या विविध संधी उपलब्ध आहेत. विविध शासकीय योजना आणि शिक्षणाला प्रोत्साहन देणाऱ्या सामाजिक संस्था यामुळे शिक्षण प्राप्त करणे सुलभ झाले आहे. याचा लाभ विद्यार्थ्यांनी घेतला पाहिजे, असे काळकर यांनी नमूद केले. कोणाचीही नक्कल न करता स्वतः कष्ट घेऊन आपल्या कारकिर्दीचे नियोजन करावे. त्या दृष्टीने आपल्याला कोणत्या क्षेत्रात ज्ञान प्राप्त करायचे आहे, कोणती कौशल्य आत्मसात करायची आहेत, याची पुढील पाच वर्षांची रूपरेषा निश्चित करावी, असेही त्यांनी विद्यार्थ्यांना सांगितले. भाषा, भाषण आणि संभाषण हे गुण अंगी असणेही यश प्राप्त करण्यासाठी आवश्यक आहे. आपल्या क्षेत्रातील सखोल ज्ञान घेण्याबरोबरच अधिकाधिक वाचनाने इतर क्षेत्रातील माहिती देखील करून घेतली पाहिजे.

तसेच माणूस समजावून घेऊन समूहात काम करण्याची तयारी हवी. समस्या सोडवण्याची मानसिकता हवी. आयुष्यात अनेकदा नवनवे प्रश्न उभे राहतात. ते सोडवण्याची क्षमता हवी, असे मार्गदर्शन काळकर यांनी विद्यार्थ्यांना केले.

आमदार सिद्धार्थ शिरोळे म्हणाले, आयुष्यात यशस्वी होण्यासाठी विचारांमध्ये सुस्पष्टता असणे आवश्यक असल्याचे मत आमदार शिरोळे यांनी व्यक्त केले. अनावश्यक चर्चा करून वेळ घालवण्यापेक्षा भविष्याचा वेध घेणे आवश्यक आहे. औपचारिक शिक्षणाप्रमाणेच छंदांची जोपासनाही केली पाहिजे. अनेकदा छंदांच्या जोपासणेतून यशस्वी कारकीर्द घडवल्याचीही अनेक उदाहरणे दिसून येतात, हे त्यांनी निदर्शनास आणून दिले. औंध बोपोडी परिसरातील सर्व नगरसेवक आणि आपण 25 विकास कामांचे उद्दिष्ट निश्चित केले असून पुढील पाच वर्षात या परिसराचा चेहरा मोहरा बदलून टाकू, अशी ग्वाही देखील त्यांनी दिली.

# 'बंधिनी' चित्रपटातून साकारणार स्त्री भावविश्वाची कहाणी

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

मराठी चित्रपटांत स्त्री विषयक समस्यांचा मागोवा घेणाऱ्या उत्तमोत्तम चित्रपटांची मोठी परंपरा आहे. हीच परंपरा पुढे नेणारा 'बंधिनी' हा चित्रपट येत्या ९ ऑक्टोबरला आपल्या भेटीला येणार आहे. नुकताच या चित्रपटाचा पोस्टर अनावरण सोहळा संपन्न झाला. यावेळी चित्रपटाची संपूर्ण टीम उपस्थित होती. सत्या फिल्म्स कंपनी निर्मित, सतीश वाघेला लिखित आणि संतोष मांजरीकर दिग्दर्शित 'बंधिनी' हा चित्रपट एका स्त्रीच्या भावनिक प्रवासाची कथा मांडतो. देविका या मध्यवर्ती पात्राभोवती फिरणारी ही कथा प्रेम, त्याग, कर्तव्य, कुटुंब आणि स्वतःच्या अस्तित्वाच्या शोधाचा संवेदनशील वेध घेते. 'बंधिनी' ही केवळ एका स्त्रीच्या संघर्षाची कथा नसून, प्रत्येक नात्यामधील प्रेम, त्याग आणि आत्मसन्मानाचा अर्थ नव्याने उलगडणारी भावनिक सफर आहे. चित्रपटात अश्विनी बागल, भूषण शिवतरे आणि



योगेश तनपुरे यांच्या प्रमुख भूमिका असून, त्यांच्या प्रभावी अभिनयातून ही कथा अधिक सशक्तपणे उलगडणार आहे.

चित्रपटाचे दिग्दर्शक संतोष मांजरीकर म्हणाले, "आजच्या काळात प्रत्येक स्त्री स्वतःची स्वप्नं आणि कुटुंबाची जबाबदारी यामध्ये समतोल साधण्याचा प्रयत्न करत असते. 'बंधिनी' ही अशाच एका स्त्रीची कथा आहे, जी अनेक महिलांच्या आयुष्याशी जोडली जाईल.

प्रेक्षकांना विचार करायला लावणारा आणि मनाला स्पर्श करणारा चित्रपट देण्याचा आमचा प्रयत्न आहे." 'बंधिनी' हा केवळ मनोरंजन करणारा चित्रपट नाही, तर प्रत्येक कुटुंबाला आणि प्रत्येक स्त्रीला स्वतःमध्ये पाहायला लावणारा अनुभव आहे.

# ३० उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या प्रशिक्षणार्थींचा केला गौरव

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

जागतिक युवा कौशल्य दिनानिमित्त सॅमसंग इंडिया ने 2025 मध्ये प्रशिक्षण घेतलेल्या 9,400 युवकांमधून निवडलेल्या 30 डिओएसटी सेल्स उत्कृष्ट प्रशिक्षणार्थींच्या यशाचा गौरव केला. संघटित रिटेल क्षेत्रातील करिअरसाठी युवकांना तयार करणाऱ्या कंपनीच्या प्रमुख सीएसआर कौशल्य विकास कार्यक्रम सॅमसंग डिओएसटी अंतर्गत या उत्कृष्ट प्रशिक्षणार्थींचा सन्मान करण्यात आला. शिक्षण आणि रोजगार यांच्यातील अंतर कमी करण्याच्या उद्देशाने तयार करण्यात आलेला सॅमसंग डिओएसटी हा कार्यक्रम विशेष



सेल्स प्रशिक्षणाद्वारे युवकांना रिटेल क्षेत्रातील फ्रंटलाइन करिअरसाठी सक्षम बनवतो. सहभागी प्रशिक्षणार्थींना सरकारमान्य प्रमाणपत्र, प्रत्यक्ष रिटेल वातावरणातील अनुभव आणि व्यावहारिक कार्यस्थळ प्रशिक्षण मिळते. ज्यामुळे त्यांची रोजगारक्षमता आणि करिअरसाठीची तयारी अधिक मजबूत होते. सुरुवातीपासूनच सॅमसंग डिओएसटी सेल्सने भारतभरातील हजारो युवकांना उद्योगाशी संबंधित कौशल्ये आत्मसात करण्यास मदत केली आहे.

# एक्सपर्टव्ह्यू प्रीस्कूलमध्ये पालखी सोहळा उत्साहात

## 'ज्ञानोबा-तुकाराम'च्या जयघोषाने परिसर भक्तिरसात; चिमुकल्यांना वारकरी संस्कृतीची ओळख

**लोणीकंद (दै. आरंभ पर्व)**

लोणीकंद येथील एक्सपर्टव्ह्यू प्रीस्कूलमध्ये आषाढी एकादशीनिमित्त पारंपरिक पालखी सोहळा मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला. 'ज्ञानोबा-तुकाराम', 'विठ्ठल विठ्ठल जय हरी विठ्ठल' या नामघोषाने शाळेचा परिसर दुमदुमून गेला.

या सोहळ्यात विद्यार्थ्यांनी वारकऱ्यांचा पारंपरिक वेश परिधान करून पालखी मिरवणुकीत उत्स्फूर्त सहभाग घेतला. टाळ-मृदंगाचा गजर, फुगडी, अभंग आणि भक्तिगीतांमुळे संपूर्ण परिसर भक्तिरसाने भारावून गेला. चिमुकल्या वारकऱ्यांचा उत्साह उपस्थितांचे विशेष लक्ष वेधून घेत



होता. या उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना महाराष्ट्राची समृद्ध संतपरंपरा, वारकरी संस्कृती, भारतीय संस्कार, भक्तीभाव तसेच सांस्कृतिक मूल्यांची ओळख करून देण्यात आली. लहान वयातच विद्यार्थ्यांच्या मनात आपल्या परंपरा आणि संस्कृतीविषयी जिव्हाळा निर्माण व्हावा, या उद्देशाने या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी शाळेच्या संस्थापिका वर्षा गोटे आणि सहसंस्थापक नितेश गोटे यांनी विद्यार्थ्यांना आषाढी एकादशीचे महत्त्व समजावून सांगितले. अशा सांस्कृतिक उपक्रमांमुळे मुलांमध्ये संस्कार, शिस्त, सहकार्याची भावना आणि भारतीय संस्कृतीबद्दल आदर निर्माण होण्यास मदत होते, असे त्यांनी सांगितले.

# गोपनीय माहितीच्या सुरक्षिततेचे भविष्यामध्ये सायबर क्षेत्रापुढे आव्हान

- 'इन्व्हेस्टीगेशन मास्टरक्लास' दिवस दुसरा
- ट्रान्सेंडेंटल टेक्नॉलॉजीज, डीओटी -एसएसपीयू यांचा संयुक्त उपक्रम
- पुनीत बालन ग्रुपच्या सहकार्याने आयोजित राष्ट्रीय तपास प्रशिक्षण कार्यक्रम



सायबर क्षेत्रामध्ये गुन्हेगार आणि तपास यंत्रणा यांच्यामध्ये मोठी तफावत दिसून येते. जेव्हा सायबर गुन्हा उघडकीस येतो त्यापूर्वी किमान सहा महिने ते एक वर्ष गुन्हेगाराने त्या संदर्भात काम सुरू केलेले असते. जेव्हा गुन्हा उघडकीस येतो त्या काळामध्ये मोठ्या प्रमाणावर तंत्रज्ञानही बदललेले असते, असेही कुणाल पाटील यांनी यावेळी सांगितले. रोहन बनकर यांनी सोशल मीडिया आणि सायबर क्राईम तपास, कर्नल संभव खुगशाल यांनी माहिती तंत्रज्ञान आणि जीआरसी तसेच कुलदीप सोनार यांनी इन्वेस्टीगेटिंग डार्क वेब आणि पॅटरीसिया शिफुनेस यांनी सायबर क्राईम इन्वेस्टीगेशन या संदर्भात कार्यशाळेमध्ये मार्गदर्शन केले.

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

बदलत्या काळानुसार सायबर क्षेत्रातील हल्ल्यांचे आणि गुन्हेगारीचे प्रकार बदलत आहेत. आता केवळ आर्थिक लाभासाठीच नव्हे तर गोपनीय माहितीची चोरी करण्यासाठी ही मोठ्या प्रमाणावर सायबर हल्ले होतात. यामध्ये वैयक्तिक माहिती पासून ते देशाच्या दृष्टीने महत्त्वाच्या अशा माहितीची चोरी होण्याचे प्रमाण वाढत आहे. त्यामुळे गोपनीय माहितीच्या सुरक्षिततेचे भविष्यामध्ये सायबर क्षेत्रापुढे मोठे आव्हान आहे असे मत सायबर क्षेत्रातील तज्ज्ञांनी व्यक्त केली. ट्रान्सेडेंटल टेक्नॉलॉजीज, तंत्रज्ञान विभाग सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, यांच्या संयुक्त विद्यमाने पुनीत बालन ग्रुप च्या सहकार्याने पुणे विद्यापीठाच्या जिऑलॉजी विभागामध्ये आयोजित करण्यात आलेल्या 'इन्व्हेस्टीगेशन मास्टरक्लास' सायबर सुरक्षा संदर्भातील कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेत दुसऱ्या दिवशी सायबर क्षेत्रातील तज्ज्ञांनी भविष्यामध्ये गोपनीय माहितीचे संरक्षण कशाप्रकारे करता येणे शक्य आहे या संदर्भात प्रशिक्षण दिले. ज्येष्ठ सायबर तज्ज्ञ अमलेश मेंढेकर, कुणाल पाटील यांनी मार्गदर्शन केले . ट्रान्सेडेंटल टेक्नॉलॉजीज चे प्रमुख केतन अत्रे यावेळी उपस्थित होते.

अमलेश मेंढेकर म्हणाले, ज्याप्रमाणे वैयक्तिक वापरापासून ते देशाच्या संरक्षण क्षेत्रापर्यंत मोठ्या प्रमाणावर तंत्रज्ञानाचा वापर वाढत आहे , त्याच प्रमाणे सायबर हल्ल्यांचे प्रमाणही वाढत आहे. सध्या जगामध्ये प्रत्येक 39 सेकंदा नंतर यशस्वी सायबर हल्ला होत आहे . तसेच पाच लाख साठ हजार मालवेअर सॉफ्टवेअर तयार होऊन सायबर हल्ले तयार केले जात आहेत. इतक्या मोठ्या प्रमाणावर सायबर हल्ल्यांचे व्यापकता वाढली आहे. त्यामुळे अशा प्रकारच्या सायबर हल्ल्यांना सामोरे जाण्यासाठी पारंपारिक पद्धत पुरेशी पडणार नाही, सायबर हल्ले रोखण्यासाठी आणि त्यांचा तपास करण्यासाठी आर्टिफिशियल इंटेलिजन्स चा वापर वाढणेही तितकेच गरजेचे आहे. आर्टिफिशियल इंटेलिजन्स ला कमांड देण्यासाठी पूर्वी कोडींग चा अभ्यास असणे गरजेचे होते परंतु सध्या आर्टिफिशियल इंटेलिजन्स सोबत रोजच्या वापरण्याच्या भाषेमध्येही संवाद साधता येणे शक्य आहे त्यामुळे गुन्ह्याचे प्रमाणही वाढत असून त्यांची क्लिष्टताही वाढत आहे अशावेळी हे गुन्हे सोडविण्यासाठी अधिकाधिक तंत्रज्ञानाची माहिती आणि प्रशिक्षण घेणे आवश्यक आहे असेही अमलेश मेंढेकर यांनी यावेळी सांगितले.

कुणाल पाटील म्हणाले, आज तपास यंत्रणांच्या संस्थांमधील कर्मचाऱ्यांवर कामाचा मोठा ताण आहे, तसेच गुणवत्ता पूर्ण प्रशिक्षण आणि साधनांची कमी आहे. सायबर गुन्ह्यांचा तपास करताना हा मोठा अडथळा असून सायबर गुन्हेगारी विषयक काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचे आधुनिक प्रशिक्षण कायम होत राहणे गरजेचे आहे.

दैनिक आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com
गुरुवार, दि. ३० जुलै २०२६








## थोडक्यात पण महत्वाचे



### ओडिशा AM/NS खो खो सेंटरचा दुसरा वर्धापन दिन उत्साहात

भुवनेश्वर/पुरी (आरंभ पर्व) : ओडिशा AM/NS इंडिया खो खो हाय परफॉर्मन्स सेंटरने पुरी येथे दुसरा वर्धापन दिन उत्साहात साजरा केला. यावेळी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या खेळाडूंचा सत्कार करण्यात आला. तसेच खो खो निवड चाचणी २०२६ मधून १९ नवोदित खेळाडूंची सेंटरमध्ये निवड करण्यात आली. AM/NS इंडिया आणि ओडिशा सरकारच्या संयुक्त उपक्रमातून सुरू असलेल्या या सेंटरच्या खेळाडूंनी गेल्या दोन वर्षांत ३० हून अधिक राष्ट्रीय, प्रादेशिक आणि राज्यस्तरीय स्पर्धांमध्ये सहभाग घेत ४८ पदके पटकावली आहेत. खो खो विश्वचषक, राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा, खेलो इंडिया युवा स्पर्धांसह विविध राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धांमध्येही खेळाडूंनी उल्लेखनीय यश मिळवले आहे. कार्यक्रमाला भारतीय पुरुष खो खो संघाचा कर्णधार प्रतीक वायकर यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते. सेंटरच्या तिसऱ्या वर्षात जागतिक दर्जाचे खेळाडू घडवण्यावर अधिक भर दिला जाणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.




### ड्रीमे डी३० अल्ट्रा रोबोट व्हॅक्यूम भारतात दाखल; किंमत ₹५२,९९९

पुणे (आरंभ पर्व) : स्मार्ट होम तंत्रज्ञान क्षेत्रातील ड्रीमे टेक्नॉलॉजीने भारतात नवीन ड्रीमे डी३० अल्ट्रा रोबोट व्हॅक्यूम लाँच केला आहे. २५,००० पास्कल सक्शन क्षमता, मॉपएक्सटेंड तंत्रज्ञान आणि स्वयंचलित स्वच्छता व देखभाल करणारे बेस स्टेशन ही या उपकरणाची प्रमुख वैशिष्ट्ये आहेत. डी३० अल्ट्रामध्ये ३.२ लिटर क्षमतेची डस्ट बॅग असून तब्बल ७५ दिवसांपर्यंत हात न लावता धूळ साठवण्याची सुविधा मिळते. तसेच मॉप धुणे-वाळवणे, पाणी भरणे आणि वॉशबोर्डची स्वच्छता ही कामे स्वयंचलितपणे केली जातात. कार्पेटवर पोहोचल्यानंतर मॉप १०.५ मिमीपर्यंत आपोआप वर उचलण्याची सुविधाही देण्यात आली आहे. ५२०० मिलिअँपिअर-तास क्षमतेची बॅटरी आणि ३० टक्के जलद चार्जिंगची सुविधा असलेल्या या रोबोट व्हॅक्यूमची किंमत ₹५२,९९९ ठेवण्यात आली आहे. १ ऑगस्टपासून हे उत्पादन ड्रीमे इंडियाच्या संकेतस्थळासह क्रोमा आणि निवडक किरकोळ दुकानांमध्ये उपलब्ध होणार आहे.

### आशाताई शिंदे-गायकवाड यांना ‘संविधान सन्मान साहित्य पुरस्कार’



पुणे (आरंभ पर्व) : विश्वबंधुता साहित्य परिषद, विश्वबंधुता काव्यमंच आणि काषाय प्रकाशन या संस्थांच्या वतीने क्रांती दिन आणि स्वातंत्र्य दिनाच्या पार्श्वभूमीवर आयोजित तिरंगा महोत्सवात दिला जाणारा 'संविधान सन्मान साहित्य पुरस्कार' यंदा प्रसिद्ध गीतकार आशाताई शिंदे-गायकवाड यांना जाहीर झाला आहे. शनिवार, ८ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी १० वाजता पत्रकारभवन, नवी पेठ, पुणे येथे होणाऱ्या महोत्सवात तिरंगा महावस्त्र, संविधान राष्ट्रग्रंथ, सन्मानचिन्ह आणि मानपत्र देऊन सन्मानित करण्यात येणार आहे, अशी माहिती महोत्सवाचे अध्यक्ष बंधुताचार्य प्रकाश रोकडे यांनी दिली. "महोत्सवात ज्येष्ठ साहित्यिका ॲड. प्रार्थना सदावर्ते यांच्या हस्ते कादंबरीकार प्रा. शंकर आथरे यांच्या 'वाणी विश्वबंधुतेची' या भाषण संग्रहाचे प्रकाशन होईल. 'विश्वबंधुतेची पहाट' काव्यसंमेलनात २५ निमंत्रित कवी सहभागी होतील. स्वागताध्यक्ष डॉ. बंडोपंत कांबळे, प्रा. चंद्रकांत वानखेडे, कवयित्री संगीता झिंजुर्के, प्रकाशक मंदाकिनी रोकडे यांचा विशेष सहभाग असणार असून, काही निवडक साहित्यिकांना 'विश्वबंधुता प्रकाशदूत साहित्य पुरस्कार' देऊन सन्मानित करण्यात येणार आहे," असे प्रकाश रोकडे यांनी नमूद केले.



### आर. बी. होरांगी आणि सेंट फेलिक्स स्कूलच्या खेळाडूंची चमकदार कामगिरी

पुणे (आरंभ पर्व) : दक्षिण कोरियातील मुजू येथे नुकत्याच झालेल्या जागतिक तायक्वांदो स्पर्धेत (वर्ल्ड तायक्वांदो कल्चर एक्सपो चॅम्पियनशिप - डब्ल्यूटीसीई) पुण्यातील आर. बी. होरांगी तायक्वांदो दो-जांग असोसिएशनच्या खेळाडूंनी उत्कृष्ट कामगिरी केली. मुजू येथे झालेल्या स्पर्धेत संघाने तीन सुवर्ण, तीन रौप्य आणि तीन कांस्य, तर इंचॉन येथे झालेल्या वर्ल्ड ऑलिम्पिक तायक्वांदो फेडरेशनच्या वतीने झालेल्या स्पर्धेत सहा रौप्य आणि पाच कांस्य पदके जिंकून भारताचा गौरव वाढवला. मुजूमध्ये झालेल्या स्पर्धेत पूमसे आणि क्योरोगी प्रकारात मंथन देवी व कृती दवे याने यांनी प्रत्येकी एक सुवर्ण व एक रौप्य, आरवी गवारे हिने दोन कांस्य, कल्याणी डफळ हिने एक सुवर्ण व एक कांस्य, तर प्रांजल पानसे हिने एक रौप्य व एक कांस्य पदक जिंकले. इंचॉन येथे झालेल्या स्पर्धेतही उल्लेखनीय कामगिरी करीत पूमसे आणि क्योरुगी प्रकारात मंथन देवी याने दोन रौप्य, कृती दवे हिने एक रौप्य व एक कांस्य, आरवी गवारे हिने एक रौप्य व एक कांस्य, कल्याणी डफळ हिने एक रौप्य व एक कांस्य, प्रांजल पानसे हिने एक रौप्य व एक कांस्य पदक पटकविले. या स्पर्धेत एकूण २८ देशांनी सहभाग घेतला होता. 'डब्ल्यूटीसीई' स्पर्धेत ३,००० हून अधिक, तर 'डब्ल्यूओटीएफ' स्पर्धेत २,३०० हून अधिक खेळाडूंनी सहभाग घेतला. वर्ल्ड तायक्वांदो कल्चर एक्सपोच्या अध्यक्षांच्या नेतृत्वात आयोजित या स्पर्धेला अनेक देशांतील 'ग्रँड मास्टर्स' उपस्थित होते. सारंग ढोका, योगेश मुदलियार, श्रीनिवास केडगोनी, तनिष्क बांगर, क्रिश केडगोणी, बसवराज भंडारी, आदिनाथ कुदळे, राजेंद्र साळुंखे, विशाल गावटे, स्वाती भंडारी यांच्यासह पालकांनी स्पर्धेसाठी सहकार्य केले. संपूर्ण आंतरराष्ट्रीय दौरा, संघ व्यवस्थापन आणि खेळाडूंचे प्रशिक्षण यांचे नेतृत्व मास्टर रवींद्र भंडारी यांनी केले.

# शरीरसौष्ठव व नशेसाठी इंजेक्शनचा बेकायदेशीर साठा

## कात्रजमध्ये पाच जणांवर गुन्हा : ‘मेफेन्टरमाइन सल्फेट’च्या ५० बाटल्या जप्त

- औषध विक्रीचा परवाना नसतानाही विक्रीसाठी साठा केल्याचा आरोप



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

शरीरसौष्ठव तसेच नशेसाठी गैरवापर होऊ शकणाऱ्या ‘मेफेन्टरमाइन सल्फेट इंजेक्शन आयपी (MEPHIVAN)’ या औषधाचा कोणताही वैध औषध विक्री परवाना नसताना बेकायदेशीररीत्या साठा करून विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगल्याप्रकरणी आंबेगाव पोलिसांनी पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. कात्रज-दत्तनगर रस्त्यावरील आनंद दरबारजवळ ही कारवाई करण्यात आली. या कारवाईत पोलिसांनी संबंधित इंजेक्शनच्या ५० बाटल्या जप्त केल्याचे पोलीस नोंदीत नमूद करण्यात आले आहे.

अथर्व इंद्रजित शिंदे (वय २४, रा. गुलाबनगर, धनकवडी), अविनाश शिवा बळुंगी (वय २२, रा. संभाजीनगर, धनकवडी), प्रदीप जितेंद्र हुंबरे (वय २६, रा. जांभुळवाडी रोड, आंबेगाव), पियुष गणेश भरम (वय २६, रा. आंबेगाव पठार) आणि लक्ष्मण परमेश्वर माने (वय ३६, रा. आंबेगाव) अशी गुन्हा दाखल करण्यात आलेल्या पाच जणांची नावे असल्याचे पोलीस नोंदीत म्हटले आहे. पोलीस नोंदीनुसार, २४ जुलै रोजी रात्री सुमारे ११ वाजून २० मिनिटांच्या सुमारास कात्रज-दत्तनगर रस्त्यावरील आनंद दरबारजवळील सार्वजनिक रस्त्यावर ही कारवाई करण्यात आली. संबंधित पाच जणांच्या ताब्यात ‘मेफेन्टरमाइन सल्फेट इंजेक्शन आयपी (MEPHIVAN)’च्या ५० बाटल्या आढळल्याचा पोलिसांचा दावा आहे. संबंधित व्यक्तींकडे औषध विक्री करण्यासाठी आवश्यक असलेला परवाना नसल्याचे तसेच अशा प्रकारच्या औषधांच्या विक्रीसाठी आवश्यक पात्रता अथवा अधिकृतता नसल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे हा साठा नेमका कोठून आणण्यात आला, तो कोणाला विकला जाणार होता आणि यापूर्वी अशा इंजेक्शनची विक्री करण्यात आली आहे का, या अनुषंगाने तपास केला जात आहे.

### “तरुण पिढीला नशेच्या विळख्यातून वाचवण्यासाठी कठोर कारवाई”



“सध्याच्या काळात तरुणांमध्ये विविध प्रकारच्या नशेचे प्रमाण वाढत असून, तरुण पिढी या नशेच्या विळख्यात खोलवर अडकत चालल्याचे गंभीर चित्र दिसून येत आहे. अमली व नशेसाठी वापरल्या जाणाऱ्या पदार्थांचा गैरवापर हा केवळ संबंधित व्यक्तीच्या आरोग्यासाठीच नव्हे, तर कुटुंब आणि संपूर्ण समाजासाठी चिंतेचा विषय आहे. समाजात अशा नशेसाठी वापरल्या जाणाऱ्या पदार्थांची बेकायदेशीर विक्री, साठवणूक आणि वितरण करणाऱ्यांविरोधात पोलिसांकडून कठोर कारवाई करण्यात येत आहे. तरुण पिढीला नशेपासून दूर ठेवणे आणि अशा बेकायदेशीर कृत्यांना आळा घालणे यासाठी आंबेगाव पोलीस ठाण्याकडून यापुढेही प्रभावी आणि सातत्यपूर्ण कारवाई केली जाईल.”

**- शरद आसाराम झिने (वरिष्ठ पोलीस निरीक्षक, आंबेगाव पोलीस ठाणे)**

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, जप्त करण्यात आलेल्या इंजेक्शनचा शरीरसौष्ठव तसेच नशेसाठी गैरवापर केला जाऊ शकतो. डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय अथवा वैद्यकीय देखरेखीशिवाय अशा औषधांचा वापर केल्यास आरोग्यावर गंभीर दुष्परिणाम होण्याची शक्यता असतानाही आरोपींनी गैरवापराच्या उद्देशाने इंजेक्शनचा साठा केल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे.

विशेष म्हणजे, औषध विक्रीचा अधिकृत परवाना नसताना हा साठा जवळ बाळगण्यात आल्याचा पोलिसांचा दावा आहे. त्यामुळे इंजेक्शनचा साठा कोणत्या पुरवठादाराकडून मिळवण्यात आला, त्यामागे आणखी कोणाचा सहभाग आहे का आणि पुणे शहरात अशा इंजेक्शनच्या बेकायदेशीर विक्रीचे जाळे कार्यरत आहे का, याचाही तपास होण्याची शक्यता आहे. फिर्यादीत नमूद केलेल्या माहितीनुसार, संबंधितांकडे औषध विक्रीचा परवाना नव्हता. तसेच औषध विक्री करण्यासाठी आवश्यक शैक्षणिक पात्रता किंवा अधिकृत मान्यताही नसल्याचा पोलिसांचा आरोप आहे. तरीदेखील संबंधित इंजेक्शनच्या बाटल्या विक्रीसाठी जवळ बाळगण्यात आल्याचे पोलिसांचे म्हणणे आहे.

डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय संबंधित औषधाचा वापर केल्यास गंभीर आरोग्यविषयक परिणाम होऊ शकतात, याची माहिती असूनही नशेसाठी गैरवापर करण्याच्या उद्देशाने हा साठा बेकायदेशीररीत्या ठेवण्यात आल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे. या प्रकरणाची फिर्याद पोलीस कर्मचारी नितीन सोनबा कातुई यांनी सरकारतर्फे दिल्याचे नोंदीत नमूद आहे. त्यानुसार आंबेगाव पोलीस ठाण्यात पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

घटनेची माहिती मिळाल्यानंतर आंबेगाव पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी घटनास्थळी भेट देऊन परिस्थितीची पाहणी केली. वरिष्ठ पोलीस निरीक्षक शरद झिने यांच्यासह पोलीस निरीक्षक, सहायक पोलीस निरीक्षक आणि पोलीस उपनिरीक्षक दर्जाच्या अधिकाऱ्यांनी घटनास्थळी भेट दिल्याचे नोंदीत म्हटले आहे. या प्रकरणाचा पुढील तपास आंबेगाव पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक करीत आहेत.

### ५० इंजेक्शनच्या बाटल्या जप्त

कारवाईत ‘MEPHIVAN’च्या एकूण ५० इंजेक्शनच्या बाटल्या जप्त करण्यात आल्या आहेत. पोलीस नोंदीमध्ये जप्त मालाच्या किंमतीबाबत आकड्यांमध्ये विसंगती दिसत असली, तरी संबंधित इंजेक्शनचा साठा पोलिसांनी ताब्यात घेतल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. औषधांचा गैरवापर करण्याच्या उद्देशाने अनधिकृतरीत्या साठा करून विक्री करण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप संबंधितांवर करण्यात आला आहे. या प्रकरणात भारतीय न्याय संहिता, २०२३ मधील संबंधित तरतुदींसह औषधे व सौंदर्यप्रसाधने अधिनियम, १९४० मधील कलमांनुसार गुन्हा नोंदविण्यात आल्याचे पोलीस नोंदीत नमूद आहे.

### इंजेक्शन आले कुठून? महत्त्वाचा धागा

या कारवाईनंतर आता जप्त इंजेक्शनच्या पुरवठा साखळीचा शोध घेणे महत्त्वाचे ठरणार आहे. आरोपींकडे एवढ्या प्रमाणात इंजेक्शन कसे आले, त्याची खरेदी कोठून करण्यात आली, त्यासाठी कोणत्याही बनावट अथवा अन्य व्यक्तीच्या परवान्याचा वापर झाला का, ही इंजेक्शने कोणाला विकण्यात येणार होती आणि यापूर्वी अशाच पद्धतीने किती इंजेक्शनची विक्री झाली, या प्रश्नांची उत्तरे तपासातून समोर येण्याची शक्यता आहे.

शरीरसौष्ठवाच्या नावाखाली किंवा नशेसाठी अशा औषधांची बेकायदेशीर विक्री होत असल्यास त्यामागील संपूर्ण साखळी शोधण्याचे आव्हान पोलिसांसमोर आहे. या प्रकरणात आणखी व्यक्तींचा सहभाग आढळतो का, तसेच जप्त औषधांच्या खरेदी-विक्रीशी संबंधित आर्थिक व्यवहार आणि संपर्कांची माहिती मिळते का, याकडेही लक्ष लागले आहे.

## विवो इग्नाइटने देशभरातील तरुणांमध्ये निर्माण केला उत्साह

**नवी दिल्ली (दै. आरंभ पर्व)**

विवो इंडियाने आज जाहीर केले की, शालेय विद्यार्थ्यांसाठी असलेल्या त्यांच्या विशेष देशव्यापी नवोन्मेष कार्यक्रम, विवो इग्नाइट २०२६ ला ३८,००० हून अधिक नोंदणी मिळाली आहे, ज्यामुळे ही आतापर्यंतची सर्वात मोठी आवृत्ती ठरली आहे. यावर्षी, विवो इग्नाइट २०२६ साठी १२,००० हून अधिक शाळा, ७०५ जिल्हे आणि ४,५०० हून अधिक शहरांमधून नोंदणी झाली. सर्व २८ राज्ये आणि ८ केंद्रशासित प्रदेशांमधील, तसेच ९२ महत्त्वाकांक्षी जिल्ह्यांमधील विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी नोंदणी केली. ही आकडेवारी देशभरातील




तरुण विद्यार्थ्यांमध्ये वास्तविक जीवनातील आव्हानांवर उपाय शोधण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर करण्याबाबत वाढत असलेला उत्साह आणि आवड दर्शवते. इयत्ता ८ वी ते १२ वीच्या विद्यार्थ्यांनी ६,१०० हून अधिक कल्पना सादर केल्या. या कल्पनांमध्ये संयुक्त राष्ट्रांच्या शाश्वत विकास उद्दिष्टांशी संबंधित आव्हानांना सामोरे जाण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला होता.

## गुरुपौर्णिमेनिमित्त उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची पुणे शहर युवा सेना प्रमुख निलेश गिरमे यांनी घेतली सदिच्छा भेट

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

गुरुपौर्णिमेच्या पावन पर्वानिमित्त पुणे शहर युवा सेना प्रमुख निलेश गिरमे यांनी महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री तथा शिवसेनेचे मुख्य नेते एकनाथ शिंदे यांची सदिच्छा भेट घेऊन आशीर्वाद घेतले. यावेळी राज्यातील राजकीय घडामोडी, संघटनात्मक बांधणी आणि पुणे शहरातील युवा सेनेच्या कामकाजाबाबत दोघांमध्ये सविस्तर चर्चा झाली.



भेटीदरम्यान उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी निलेश गिरमे यांच्या सामाजिक आणि संघटनात्मक कार्याचे कौतुक करत त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. "निलेश, तू निःसंकोचपणे आणि प्रामाणिकपणे जनतेसाठी काम करत राहा. मी तुझ्या पाठीशी खंबीरपणे उभा आहे," असे आश्वासक शब्द त्यांनी व्यक्त केले. या शब्दांमुळे गिरमे यांना नवसंजीवनी मिळाल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली. निलेश गिरमे यांनीही एकनाथ शिंदे यांचे आशीर्वाद आणि मार्गदर्शन हेच आपली प्रेरणा असल्याचे सांगत, शिवसेनेची विचारधारा आणि सर्वसामान्य जनतेची सेवा यासाठी अधिक जोमाने काम करण्याचा निर्धार व्यक्त केला. गुरुपौर्णिमेच्या दिवशी झालेल्या या सदिच्छा भेटीला राजकीय आणि संघटनात्मकदृष्ट्या विशेष महत्त्व प्राप्त झाले. निलेश गिरमे यांच्याकडे शिवसेनेचे युवा सेनेचे अध्यक्ष पदाबरोबर भिडे वाडा शासन नियुक्त समितीचे अध्यक्ष पद आहे. त्यामुळे या भेटीला विशेष महत्त्व आहे.

# ‘मराठी मिडियम' - एका शाळेची नव्हे, तर आपल्या अस्तित्वाची गोष्ट

**आज महाराष्ट्रात एक विचित्र विरोधाभास दिसून येतो. मराठी माणूस आपल्या भाषेचा अभिमान बाळगतो, मराठी अस्मितेच्या घोषणा देतो; पण स्वतःच्या मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न आला की त्याची पहिली पसंती इंग्रजी माध्यमाला असते. याच वास्तवावर नेमके बोट ठेवणारे पुस्तक म्हणजे "मराठी मिडियम."**



**(दै. आरंभ पर्व)**

हे पुस्तक केवळ मराठी माध्यमाच्या शाळांवर आधारित नाही, तर बदलत्या समाजव्यवस्थेचा, पालकांच्या मानसिकतेचा, शिक्षण व्यवस्थेतील असमतोलाचा आणि आपल्या मातृभाषेच्या अस्तित्वासाठी सुरू असलेल्या संघर्षाचा दस्तऐवज आहे.

आज महाराष्ट्रातील अनेक मराठी शाळा विद्यार्थ्यांच्या अभावी बंद पडत आहेत. काही शाळा अस्तित्व टिकवण्यासाठी धडपडत आहेत, तर काहींच्या जागी उंच इमारती उभ्या राहत आहेत. एका शाळेचा दरवाजा बंद होतो, तेव्हा केवळ एक इमारत बंद होत नाही; तर त्या परिसराचा इतिहास, संस्कृती, भाषा आणि अनेक पिढ्यांच्या आठवणीही हरवत जातात. महाराष्ट्रात मराठी माध्यमातील प्रवेशसंख्या घटत असल्याची प्रवृत्ती अनेक वर्षांपासून शिक्षण क्षेत्रात चर्चेचा विषय आहे.

"मराठी मिडियम" या पुस्तकात वाचकांना भावनिक कथा मिळते, पण त्याचबरोबर समाजाला अंतर्मुख करणारे अनेक प्रश्नही भेटतात. इंग्रजी भाषा शिकण्याला विरोध नाही; परंतु मातृभाषेच्या पायावर उभे राहून जागतिक भाषा आत्मसात करणे अधिक सक्षम मार्ग ठरू शकतो. जगातील अनेक विकसित देश प्राथमिक शिक्षण मातृभाषेत देण्यावर भर देतात, कारण विचार करण्याची क्षमता मातृभाषेत अधिक प्रभावीपणे विकसित होते.

हे पुस्तक कोणत्याही भाषेविरोधात नाही. उलट प्रत्येक पालकाने स्वतःला विचारावा असा एक साधा प्रश्न ते विचारते—

"आपल्या मुलाला इंग्रजी शिकवताना आपण मराठीपासून दूर तर नेत नाही ना?"

आजच्या डिजिटल युगात भाषा केवळ संवादाचे माध्यम नाही, तर ती आपली ओळख आहे. भाषा टिकली तर संस्कृती टिकते; संस्कृती टिकली तर समाजाची मुळे भक्कम राहतात. मराठी भाषा जिवंत ठेवण्याची जबाबदारी केवळ सरकारची किंवा शिक्षकांची नसून प्रत्येक मराठी कुटुंबाची आहे.

"मराठी मिडियम" हे पुस्तक वाचकांना दोष देत नाही; ते संवाद साधते. ते कोणत्याही विचारसरणीचा प्रचार करत नाही; ते वास्तव दाखवते. आणि म्हणूनच हे पुस्तक केवळ विद्यार्थ्यांनी किंवा शिक्षकांनी नव्हे, तर प्रत्येक पालकाने, प्रत्येक मराठी माणसाने वाचावे असे आहे.

आज गरज आहे ती केवळ मराठी भाषा वाचवण्याची नाही, तर मराठीत विचार करणारी, मराठीत स्वप्न पाहणारी आणि जगाशी स्पर्धा करणारी पिढी घडवण्याची. "मराठी मिडियम" हे पुस्तक त्या दिशेने टाकलेले एक प्रामाणिक पाऊल आहे.

शेवटी एकच... मराठी माध्यम म्हणजे मागासलेपण नाही; मराठी माध्यम म्हणजे आपल्या मातृभाषेवर, संस्कृतीवर आणि स्वतःच्या ओळखीवर असलेला विश्वास आहे.

**पुस्तकाचे लेखक – प्रशांत**

## थोडक्यात पण महत्वाचे



## स्तनपानाबाबत पीओजीएसतर्फे ‘लॅक्टेकॉन २०२६’ परिषद संपन्न

पुणे (आरंभ पर्व) : द पुणे ऑब्स्टेट्रिक अँड गायनेकोलॉजिकल सोसायटी (पीओजीएस) तर्फे द असोसिएशन ऑफ महाराष्ट्र ऑब्स्टेट्रिक्स अँड गायनेकोलॉजिकल सोसायटीज् (एएमओजीएस) च्या स्तनपान आरोग्य समितीच्या सहकार्याने आयोजित ‘लॅक्टेकॉन २०२६’ ही एकदिवसीय परिषद नुकतीच उत्साहात पार पडली. ‘आजचे स्तनपान, उद्याचे सुदृढ बालक, निरोगी कुटुंब व उज्ज्वल भविष्य’ ही परिषदेची संकल्पना होती. उद्घाटनप्रसंगी इंटरनॅशनल फेडरेशन ऑफ गायनेकोलॉजी अँड ऑब्स्टेट्रिक्स (फिगो) च्या ‘फिगो वेलवुमन हेल्थकेअर’ उपक्रमाच्या विभागीय संचालक डॉ. हेमा दिवेकर, परिषदेच्या संयोजक डॉ. मंगला वाणी, पीओजीएसच्या अध्यक्ष डॉ. उमा वानखेडे, सरचिटणीस डॉ. चारुलता बापये, खजिनदार डॉ. अमोल लुंकड, वैद्यकीय सचिव डॉ. अर्चना पुंगालिया आणि फॉग्सीच्या उपाध्यक्ष डॉ. मीनू अगरवाल आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी पीओजीएसच्या ‘स्पेक्युलम’ या नियतकालिकाचे तसेच स्तनपानाबाबत जनजागृती करणाऱ्या पोस्टर्सचे प्रकाशन करण्यात आले.



## १६० ग्रामदूतांच्या सहभागातून ‘विठ्ठल बन’मध्ये ६ टन कचऱ्याची विल्हेवाट

उरुळी कांचन (आरंभ पर्व) : प्रति पंढरपूर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या श्री क्षेत्र ‘विठ्ठल बन’, डाळींब येथे आषाढी यात्रा व बारस महाप्रसादानिमित्त होणाऱ्या भाविकांच्या गर्दीनंतर परिसरात निर्माण झालेल्या अंदाजे सहा टन कचऱ्याची विल्हेवाट लावण्यात आली. ड्रीम्स युवा सोशल फाउंडेशन संचलित उरुळी कांचन ग्रामस्वच्छता अभियान समूहाच्या नेतृत्वाखाली सलग नवव्या वर्षी विशेष स्वच्छता सेवा अभियान राबविण्यात आले. या अभियानात १६० ग्रामदूतांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. सोमवारी (दि. २७ जुलै) सकाळी ६ ते ८.३० या कालावधीत हे अभियान राबविण्यात आले. अवघ्या अडीच तासांत ग्रामदूतांनी परिसरातील अंदाजे सहा टन कचरा संकलित करून त्याची योग्य विल्हेवाट लावली. त्यामुळे विठ्ठल बन परिसर पुन्हा स्वच्छ आणि भाविकांसाठी आरोग्यदायी झाला. या विशेष स्वच्छता अभियानात ड्रीम्स युवा सोशल फाउंडेशन संचलित उरुळी कांचन ग्रामस्वच्छता अभियान समूह, आदर पुनावाला क्लीन सिटी इनिशिएटिव्ह समूह, डाळींब ग्रामस्वच्छता अभियान समूह, उरुळी कांचन ग्रामपंचायत, श्री विठ्ठल देवस्थान ट्रस्ट, डाळींब ग्रामपंचायत तसेच डाळींब गाव व पंचक्रोशीतील ग्रामस्थांनी सक्रिय सहभाग घेतला. माजी नगरसेवक धीरज घाटे यांच्या माध्यमातून कचरा संकलनासाठी वाहनांची उपलब्धता करून देण्यात आली.

## शेतकऱ्याचा चोरीला गेलेला ट्रॅक्टर सीसीटीव्हीच्या मदतीने परत

नारायणगाव (आरंभ पर्व) : पारगाव तर्फे आळे येथील शेतकऱ्याचा ट्रॅक्टर चोरी करणाऱ्या बळीराम जालिंदर तांबे (वय ३२ राहणार तांबाराजुरी, ता.पाटोदा, बीड) या भामट्यास नारायणगाव पोलिसांनी मुद्देमालासह अटक केली आहे. अशी माहिती नारायणगाव पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रविण सपांगे यांनी दिली. पिंपरखेड (ता.शिरूर) येथील शेतकरी सुनिल रामदास ढोमे (वय 33) यांनी शेती कामासाठी आणलेला ट्रॅक्टर पारगाव तर्फे आळे येथील नसीर राज मोहम्मद मोमिन यांच्या शेतातील पत्र्याच्या शेडमध्ये उभा केला होता. 23 जुलै रोजी रात्रीच्या वेळेस अज्ञात व्यक्तीने ट्रॅक्टरची चोरी केली. याबाबतची फिर्याद सुनिल ढोमे यांनी नारायणगाव पोलीस ठाण्यात दिली होती. नारायणगाव पोलीस स्टेशन, स्थानिक गुन्हे शाखा पथक यांनी सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे आरोपीचा शोध घेतला. आरोपी बळीराम तांबे याला आळेफाटा येथे सापळा लावून ट्रॅक्टरसह ताब्यात घेतले. आरोपीला अटक करण्यात आली असून पुढील तपास सापांगे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.उपविभागीय पोलिस अधिकारी धनंजय पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक प्रमोद क्षीरसागर, सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रविण सपांगे, महादेव शेलार, सहायक फौजदार दीपक साबळे, संदीप वारे, अक्षय नवले, अभिमन्यू मोटे,मंगेश लोखंडे, सोमनाथ डोके, सुभाष थोरात या पथकाने ट्रॅक्टरचा तपास लावण्यात महत्त्वाची भूमिका बजावली.

## मुलांच्या किरकोळ वादातून मलठणमध्ये दलित कुटुंबावर हल्ला

शिरूर (आरंभ पर्व) : मुलांच्या झालेल्या वादावादीचे पर्यावसान पाच ते सातजणांच्या टोळक्याने एका कुटूंबाला मारहाण करण्यात झाले. मलठण (ता. शिरूर) येथे नऊ जुलैला झालेल्या या प्रकारानंतर शिरूर पोलिसांनी आज अॅट्रॉसिटीचा गुन्हा दाखल केला. प्रेम भास्कर सोनवणे (वय ४७, रा. मलठण, ता. शिरूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून संतोष गुरव व सचिन गुरव (रा. मलठण) यांच्यासह दोघांच्या पत्नी व बहिणीविरूद्ध (पूर्ण नाव नाही) गुन्हा दाखल झाला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनूसार फिर्यादी सोनवणे यांचा मुलगा अनुराग व गुरव यांचा मुलगा आदि यांच्यात किरकोळ कारणावरून वाद झाला. याबाबत अनुराग याची आई गायत्री हिने आदि याला जाब विचारला असता त्याने त्यांना ढकलून दिले. त्यामुळे त्यांनी आदि याला एक चापट मारली. त्यावेळी त्याने घटनास्थळावरून पळ काढून वडिलांना मोबाईलवरून संपर्क साधून सोनवणे यांनी खूप मारहाण केल्याचे सांगितले. दरम्यान, काही वेळाने दोन मोटारींतून संतोष गुरव, सचिन गुरव, गुरव यांच्या कुटूंबातील तीन महिला, एक अनोळखी व्यक्तींसह सोनवणे यांच्या हॉटेलवर आले व त्यांनी जातीवाचक शिवीगाळ करीत प्रेम सोनवणे, त्यांची पत्नी गायत्री, मुलगा अनुराग यांना कुऱ्हाडीचा दांडा आणि हातातील चावीने मारहाण केली.

# मानाजीनगर चौकाने घेतला सुटकेचा श्वास; वाहतूक कोंडीला दिलासा

### रस्ता संघर्ष समितीच्या प्रयत्नांचे नागरिकांकडून कौतुक



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

"आज पहिल्यांदाच चौकात एवढी मोकळी वाहतूक दिसतेय..." अशी भावना व्यक्त करत मानाजीनगर, नऱ्हे परिसरातील नागरिकांनी आज सुटकेचा निश्वास सोडला. ग्रीनलँड कंट्री सोसायटीसमोरील चौकात अनेक महिन्यांपासून वाहतूक कोंडी ही नागरिकांच्या दैनंदिन आयुष्याचा भाग बनली होती. शाळकरी मुलांना वेळेत शाळेत पोहोचणे कठीण झाले होते, नोकरदारांना कामावर उशीर होत होता, तर ज्येष्ठ नागरिक आणि महिलांना रस्ता ओलांडताना जीव मुठीत धरावा लागत होता.

या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा निघावा म्हणून आपल्या हक्काचा रस्ता संघर्ष समिती आणि सामाजिक कार्यकर्ते रोहिदास जोरी यांनी सातत्याने प्रशासनाकडे पाठपुरावा केला. अखेर त्यांच्या प्रयत्नांना यश आले आणि चौकात वाहतूक पोलीस नियुक्त करण्यात आले. आज या निर्णयाचा प्रत्यक्ष परिणाम दिसून आला. चौकातील वाहतूक पूर्वीपेक्षा अधिक सुरळीत झाली असून वाहनांच्या लांबच लांब रांगा दिसेनाशा झाल्या आहेत. नागरिकांच्या चेहऱ्यावर समाधान आणि दिलासा स्पष्टपणे दिसून आला.

"पद नसतानाही केवळ जनहितासाठी सातत्याने लढणाऱ्या व्यक्तीमुळे हा बदल घडला," अशा शब्दांत अनेक नागरिकांनी रस्ता संघर्ष समिती यांच्या कार्याचे कौतुक केले. तसेच पुणे वाहतूक पोलीस आणि संबंधित अधिकाऱ्यांचेही आभार मानले.

याशिवाय नवले ब्रिज कडे जाणाऱ्या रस्त्यावर लोखंडी बॅरिकेट बसवण्यात येणार आहे , तसेच रस्त्यावरील लाईटचे पोल, डीपी काढण्याची ही मागणी केल्याचे यावेळी रस्ता संघर्ष समितीच्या सदस्यांनी सांगितले.

मानाजीनगर चौकाने अखेर वाहतूक कोंडीतून सुटकेचा श्वास घेतला असून, हा दिलासा कायम राहावा, हीच सर्वांची अपेक्षा आहे.

## बेस्ट सेवानिवृत्त कामगार संघर्ष समितीचा भव्य मेळावा



**डोंबिवली (दै. आरंभ पर्व)**

बेस्ट सेवानिवृत्त कामगार संघर्ष समितीच्या वतीने डोंबिवली येथील पौर्णिमा सभागृहात भव्य मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. या मेळाव्याला शेकडो बेस्ट सेवानिवृत्त कामगारांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत मोठ्या संख्येने उपस्थिती लावली. यावेळी प्रलंबित मागण्यांवरून बेस्ट प्रशासन, महापालिका प्रशासन तसेच महाराष्ट्र शासनाविरोधात तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली. जुलैअखेरपर्यंत सर्व बेस्ट सेवानिवृत्त कामगारांची ग्रॅच्युइटी व अन्य प्रलंबित देणी एकरकमी अदा करण्याचे आश्वासन देण्यात आले होते. मात्र, हे आश्वासन अद्याप पूर्ण करण्यात आले नसल्याचा आरोप मेळाव्यात करण्यात आला. एकीकडे बेस्ट प्रशासन सुवर्ण महोत्सव साजरा करत असताना दुसरीकडे आपल्या हक्काची ग्रॅच्युइटी व अन्य सेवानिवृत्ती लाभ मिळविण्यासाठी सेवानिवृत्त कामगारांना रस्त्यावर उतरून संघर्ष करावा लागत असल्याची खंत यावेळी व्यक्त करण्यात आली. मेळाव्यात सर्वानुमते ठराव मंजूर करून बेस्ट दिनाचे औचित्य साधत सर्व सेवानिवृत्त कामगारांची ग्रॅच्युइटी व अन्य सर्व प्रलंबित देणी तातडीने एकरकमी अदा करावीत, अशी मागणी करण्यात आली. त्याचबरोबर सेवानिवृत्त कामगारांना मोफत वैद्यकीय सुविधा, मोफत बस पास तसेच त्यांच्या मुलांना बेस्टच्या भरती प्रक्रियेत प्रथम प्राधान्य देण्यात यावे, अशा मागण्याही करण्यात आल्या.

## मातोश्री पार्वतीबाई कुंभार प्राथमिक शाळेचे घवघवीत यश





**दौंड (दै. आरंभ पर्व)**

सन 2025- 26 मध्ये झालेल्या इंडियन टॅलेंट ओलंपियाड या देशपातळीवर स्पर्धा परीक्षेत एकूण 42511 शाळेने सहभाग घेत आहोत त्यामध्ये दौंड मधील एस आर पी ग्रुप नंबर 5 येथील मातोश्री पार्वतीबाई कुंभार प्राथमिक शाळेतील 253 विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता त्यापैकी रंजीत शाम ठाणेदार इयत्ता दुसरी हा विद्यार्थी राज्यात 3 रा व प्रथमेश चारुदत्त कद्रू हा विद्यार्थी राज्यात 5 वा आला,त्याचे संस्थेचे सचिव श्री सुभाष गणपतराव डावरे शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा सौ. कविताताई सुभाष डावरे मुख्याध्यापक श्री संभाजी शंकर थोरात यांनी कौतुक केले तसेच परीक्षा प्रमुख सौ अपर्णा संतोष गदादे व त्यांच्या सहकाऱ्यांनी मार्गदर्शन केले त्याबद्दल त्यांचाही सत्कार करून कौतुक करण्यात आले, या यशामुळे या विध्यार्थी यांचे दौंड तालुक्यातुन कौतुक करण्यात येत आहे.

## चौदा गुन्ह्यातील आरोपींसह १७ चोरलेल्या मोटारसायकल सापडल्या



### खेड पोलिसांच्या गुन्हे अन्वेषण पथकाची कारवाई

**राजगुरुनगर (दै. आरंभ पर्व)**

विविध गुन्ह्यांमध्ये पोलीसांना गुंगारा देत असलेल्या दोन सराईत आरोपींना जेरबंद करण्यात खेड पोलीसांना यश आले असून त्यांच्याकडून १७ चोरीच्या मोटारसायकल हस्तगत करण्यात आल्या. तसेच १४ गुन्हे उघडकीस आले. याप्रकरणी रोहित आप्पासाहेब कानगुडे (वय २२) आणि चंद्रशेखर अनिल पवार (वय २२, दोघेही रा. नांदगाव, ता. कर्जत, जि. अहिल्यानगर) अशी अटक केलेल्या संशयीतांची नावे आहेत. खेड पोलिसांच्या गुन्हे अन्वेषण पथकाने ही कारवाई केली असल्याची माहिती उपविभागीय पोलीस अधिकारी अमोल मांडवे व पोलिस निरीक्षक सुभाष चव्हाण यांनी दिली. याबाबत उपविभागीय पोलीस अधिकारी अमोल मांडवे यांनी सांगितले की, दोन वर्षांपूर्वी ८ जून २०२४ रोजी खेड तालुक्यातील निमगाव खंडोबा येथे बैलगाडा शर्यतीदरम्यान उभी असलेली स्प्लेंडर दुचाकी मोटारसायकल (क्र. एम.एच. १२, टी.ई. ९४६८) अज्ञात चोरट्यांनी चोरून नेली होती. याची तक्रार खेड पोलीस ठाण्यात दाखल झाली होती. बारामती येथे वाहतूक शाखेचे पोलीस अंमलदार दत्तात्रय भोसले आणि आकाश कांबळे यांनी तपास सुरू असताना संशयास्पद बाईकची ई-चलन प्रणालीद्वारे पडताळणी केली असता संबधीत दुचाकी चोरीची असल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यांनी तात्काळ खेड पोलिसांना याबाबत कळविले.

यानंतर खेडचे पोलीस निरीक्षक सुभाष चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे अन्वेषण पथकाने सापळा रचला. त्यानुसार संबंधीत दोघांना अटक करण्यात आली. पोलीस कोठडीत कसून चौकशी केल्यावर आरोपींनी विविध ठिकाणांहून मोटारसायकली चोरल्याची कबुली दिली. त्यांच्याकडून एकूण १७ दुचाकी जप्त केल्या आणि १४ गुन्हे उघडकीस आणले. ही कारवाई उपविभागीय पोलीस अधिकारी अमोल मांडवे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक सुभाष चव्हाण यांच्या समवेत सहायक पोलीस निरीक्षक अभिजीत कुदळे, पोलीस उपनिरीक्षक श्रीकांत गोडगे, महेश गरड, पोलीस हवालदार बापूसाहेब बिडकर, महेश गोसावी, सूरज राक्षे, गोकुळ कोळी, संकेत कवडे तसेच गुन्हे अन्वेषण पथकातील इतर पोलीसांनी यशस्वीरीत्या पार पाडली.

## ४० कोटी उधळण्यापेक्षा शहर स्वच्छतेचे नियोजन स्पष्ट करा!

- राष्ट्रवादीचे गटनेते काका चव्हाण महापालिकेत आक्रमक
- घनकचरा झाडण कंत्राटावरून काका चव्हाण यांनी प्रशासनाला विचारला जाब



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

"पुणे शहराचा समाविष्ट भाग कचरामय झाला असून नागरिकांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. कंत्राटदार आणि अधिकाऱ्यांच्या ढिसाळ कारभारामुळे कचरा उचलला जात नाही. ४० कोटी रुपयांच्या कंत्राटाच्या नावाने उधळपट्टी करण्यापेक्षा प्रशासनाने स्वच्छतेचे नेमके धोरण आणि उत्तरदायित्व (Accountability) स्पष्ट करावे," असा जोरदार घणाघात राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे महापालिकेतील गटनेते सोपान उर्फ काका चव्हाण यांनी केला.

पुणे महानगरपालिकेच्या मुख्य सभेत झाडण काम प्रायोगिक प्रकल्प आणि घनकचरा कंत्राटी भरतीच्या विषयावर पार पडलेल्या चर्चेदरम्यान काका चव्हाण बोलत होते. काका चव्हाण म्हणाले, "शहराला १०० टक्के सफाई कर्मचाऱ्यांची आवश्यकता आहे यात शंका नाही, मात्र जुने कर्मचारी वेळेवर काम करत नाहीत किंवा गैरहजर राहतात. जेव्हा नागरिक कचऱ्याची तक्रार करतात, तेव्हा अधिकारी कचरा उचलला जात नसल्याची कारणे देतात. ठेकेदाराला विचारले तर तो गाडी खाली होत नसल्याचे सांगतो. अशा परिस्थितीत १ ऑगस्टपासून या नव्या धोरणाने नक्की काय बदल होणार आहे? ठेकेदार कचरा प्रकल्प गाड्या खाली होत नसल्याचे कारण देऊन हात वर करेल, मग त्याची जबाबदारी कोणाची?"

प्रशासनाच्या SOP (प्रमाणित कार्यपद्धती) वर बोट ठेवताना चव्हाण म्हणाले, "ठेकेदाराकडून आलेली SOP वॉर्ड ऑफिसर, झोनल कमिशनर, SI किंवा DSI यांपैकी कोणालाच माहिती नाही. ३७ वरून थेट ८३० कर्मचारी वाढवताना त्यांचे प्रभागावॉर मॅपिंग काय आहे? हजेरी कोठीवर सकाळी हजेरी घेण्याची व्यवस्था आहे का? की हा प्रकल्प केवळ ठेकेदारांच्या फायद्यासाठी आणि सभांसमोर प्रयोग करण्यासाठी आणला आहे?"

पावसाळ्यात शहरातील राडारोडा, चिखल आणि रस्त्यावरील कचरा उचलण्याऐवजी केवळ गवत काढणे आणि कचरा गोळा करणे एवढ्यापुरतेच काम मर्यादित ठेवले जात असल्याचा आरोपही त्यांनी केला.

शेवटी चव्हाण यांनी ठणकावून सांगितले की, "पुणेकर कर भरतात, त्यामुळे त्यांना स्वच्छ शहर मिळणे हा त्यांचा अधिकार आहे . कंत्राटदाराची उत्तरे आणि प्रशासनाचा अनभिज्ञ कारभार खपवून घेतला जाणार नाही. काम योग्य प्रकारे न झाल्यास ठेकेदाराकडून पैसे वसूल केले जाणार का आणि जबाबदार अधिकाऱ्यांवर काय कारवाई होणार, याचा स्पष्ट खुलासा प्रशासनाने करावा."

## स्वारगेट–सारसबाग परिसरात शनिवारी वाहतुकीत बदल

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त शनिवारी (ता. १) स्वारगेट आणि सारसबाग परिसरात आवश्यकतेनुसार वाहतुकीत बदल करण्यात येणार आहे. वाहनचालकांनी पर्यायी मार्गांचा वापर करावा, असे आवाहन वाहतूक शाखेचे (अतिरिक्त कार्यभार) पोलिस उपायुक्त पी. आर. पाटील यांनी केले आहे.

दुपारी दोननंतर बंद रस्ते आणि पर्यायी मार्ग - देशभक्त केशवराव जेधे चौक ते सारसबाग : जेधे चौकातून सारसबागकडे जाणारी वाहतूक बंद राहील.

पर्यायी मार्ग : सिंहगड रस्त्याकडे जाणाऱ्या वाहनांनी जेधे चौकातून सातारा रस्त्याने सरळ व्होल्गा चौक (लक्ष्मीनारायण चौक) - मित्रमंडळ चौक - स्वातंत्र्यवीर सावरकर चौक मार्गे जावे. सिंहगड रस्त्याकडून स्वारगेटकडे जाणाऱ्या वाहनचालकांनी दांडेकर पूल - नाथ पै चौक - ना. सी. फडके चौक - पूरम चौक - टिळक रस्ता मार्गे जेधे चौकाकडे जावे.

वाय जंक्शन उड्डाणपूल (जेधे चौक) : उड्डाणपुलावरून सारसबागेकडे जाण्यास मनाई करण्यात आली आहे. कात्रजकडून येणाऱ्या वाहनांनी व्होल्गा चौकातून डावीकडे वळावे.

वेगा सेंटर ते सारसबाग (ग्रेडसेपरेटर) : ग्रेडसेपरेटरमधून वाहनांना जाण्यास प्रवेश बंद राहील. वाहनांनी वेगा सेंटरवरून घोरपडे पेठ उद्यान - राष्ट्रभूषण चौक - हिराबाग चौकाकडून इच्छित स्थळी जावे.

# विठूनामाच्या गजरात दुमदुमला सूर्यदत्त नॅशनल स्कूलचा परिसर



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

ज्ञानोबा माउली-तुकाराम, जय हरी विठ्ठल, विठ्ठल विठ्ठल, असा विठूनामाचा गजर आणि पर्यावरण संवर्धनाचा जागर करीत सूर्यदत्त नॅशनल स्कुलमध्ये आषाढी एकादशीनिमित्त पालखी सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. महाराष्ट्राच्या समृद्ध वारकरी परंपरेचा संस्कार चिमुकल्या विद्यार्थ्यांवर व्हावा, त्याचबरोबर पर्यावरण संवर्धनाची जाणीव निर्माण व्हावी, या उद्देशाने सूर्यदत्त नॅशनल स्कूलमध्ये विद्यार्थ्यांसाठी पारंपरिक पालखी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. विठ्ठल-रुक्मिणीच्या जयघोषाने, अभंगांच्या सुरांनी आणि टाळ-मृदंगाच्या गजराने संपूर्ण शाळा परिसर भक्तिमय वातावरणात न्हाऊन निघाला. सूर्यदत्त एज्युकेशन फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया व उपाध्यक्षा सुषमा चोरडिया यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजिलेल्या या पालखी सोहळ्यात विद्यार्थ्यांनी पारंपरिक वारकरी वेशभूषा परिधान करून दिंडीत उत्स्फूर्त सहभाग घेतला. डोक्यावर तुळशीची वृंदावने, हातात भगवे पताके, टाळ-चिपळ्या आणि विठूनामाचा अखंड गजर यामुळे शाळेच्या परिसरात पंढरीच्या वारीचे जिवंत चित्र साकार झाले. चिमुकल्यांनी सादर केलेल्या अभंग, भक्तिगीते आणि सांस्कृतिक कार्यक्रमांनी उपस्थित पालक व शिक्षकांची मने जिंकली.

या उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना वारकरी संप्रदायाची परंपरा, आषाढी वारीचे महत्त्व तसेच संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम आणि इतर संतांच्या विचारांचा परिचय करून देण्यात आला. श्रद्धा, समता, सेवा, नम्रता आणि समाजहिताचा संदेश देणारी वारकरी परंपरा अनुभवात्मक शिक्षणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यात आली. कथाकथन, भक्तिगीते, संवादात्मक उपक्रम आणि विविध सांस्कृतिक सादरीकरणांतून विद्यार्थ्यांनी भारतीय संस्कृतीचा आनंद घेतला.

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) मा. श्री. लक्ष्मण साबळे (निवासी संपादक) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.